# छंदोबध्द

“मी जरा मॉडेलच्या जवळ बसले तर चालेल? वयामुळे मला पाठीमागून नीट दिसत नाही”, सरूमावशींनी चित्रकलेच्या सरांना विचारलं.

“इथे सगळयांचीच वयं झाली आहेत. माझीच पंचावन्नी झाली यंदा”, सरांनी त्यांची खिल्ली उडवली.

“खरं आहे. आज माझाही ऐंशीवा वाढदिवस आहे”, इति बर्थडे गर्ल, सरूमावशी.

सरांनी मावशींची खुर्ची स्वतः नेऊन मॉडेलजवळ ठेवली!

सरूमावशींना चित्रं काढायची लहानपणापासून हौस होती. वडलांच्या आणि यजमानांच्याही फिरतीच्या नोकरीमुळे ते शिकायला कधी जमलंच नाही. एकट्या पडल्यावर मुलाकडे कॅलिफोर्नियाला गेल्या; तिथल्या कोंडलेपणाला वैतागल्या; सुनेच्या संसारात लुडबुडल्या आणि नकोशा झाल्या. त्यांना पेंटिंगच्या क्लासला घालायची शक्कल मुलानेच लढवली. नेण्या-आणण्याची जबाबदारी सुनेने आपण होऊन स्वीकारली. भांडणं तर मिटलीच पण फिरतीच्या निमित्ताने पाहिलेली सगळी गावं आणि माणसं आता मावशींच्या कुंचल्यातून कॅनव्हासवर साकारताहेत. सगळं जगच त्यांच्या चित्रांत बंदिस्त होतं आहे आणि त्या मुक्त झाल्या आहेत!

एखाद्या गोष्टीची आवड असल्यामुळे ती फावल्या वेळात मन रमवायला, मनापासून केली; सातत्याने केली गेली की तिला छंद म्हणायचं. पोळया लाटणं, कारकुनी खर्डेघाशी करणं किंवा कुठलंही रोजमर्‍र्याचं काम हा छंद नव्हे. अनेकांना उतारवयातल्या रिकामपणाची भीती वाटते; निवृत्ती नकोशी वाटते. तसं पाहिलं तर प्रत्येकाला कशाची-ना-कशाची आवड असतेच. तेच रिकामपणी करायला घेतलं की त्याचा छंद होतो. छंद हे बालपणीच्या खेळांसारखे, ओढ लावणारे, गुंगवणारे, उत्कट आनंद देणारे असतात. ते सोबतीला असले तर कुठल्याही वयात वेळ मजेत घालवता येतो. ते त्या वयात झेपणारे आणि सातत्याने झेपत रहाणारे असले की झालं. नाच, धावपळीचे खेळ किंवा उंच डोंगर चढणं हे पन्नाशीनंतर सुरू करायचे छंद नाहीत. पण पेटी वाजवणं, नवी भाषा शिकणं, फोटोग्राफी यांना वयाची मर्यादा नसते. रवींद्रनाथ टागोरांनी तर वयाच्या साठीला चित्रकलेचा रीतसर अभ्यास सुरू केला आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करायला पुलंनी पन्नासाव्या वर्षी बंगाली शिकणं आरंभलं.

मंगेशीच्या तुळशीमायला गजरे गुंफायचा भारी शौक. रोज नाना प्रकारची परडीभर फुलं वेचून नखरेल टाक्यांनी, गाठींनी ती त्यांचे वळेसार गुंफते आणि लेकीबाळींच्या, नातींच्या आंबाड्यांवर, वेण्यांत आपल्या हाताने माळून धन्य होते. आंजर्ल्याच्या थोरल्या खोतांना तऱ्हेतऱ्हेचे दगड गोळा करायचं वेड आहे. वडगावचे वडीलधारे कुळकर्णीमास्तर वेगवेगळी पानं शास्त्रोक्त पध्दतीने सुकवून त्यांचे आल्बम बनवतात. वसूआत्या नाना प्रकारचे जिन्नस बनवून

नातजावयांना खाऊ घालतात. नाशिकच्या रमाकाकूंना स्वतःचा पोलका शिवायची हौस होती. तेवढंच शिवणकाम शिकवायला कुणी तयार नव्हतं म्हणून त्यांनी पूर्णच क्लास लावला. आता नातवंडांना मस्त फॅशनची झबली, परकर-पोलकी शिवताना त्यांची हौस सत्कारणी लागते आहे. मुंबईचे देसाई इंजिनीयर निवृत्तीनंतर सीनियर सिटिझन्स क्लबमध्ये कॉन्ट्रॅक्ट-ब्रिज खेळतात आणि मिसेस देसाई लायब्ररीत व्हॉलंटीयर म्हणून काम करतात.

मनाजोगा छंद हेच आयुष्याचं काम असायला आणि ते निवृत्तीनंतरही चालू ठेवता यायला फार मोठं भाग्य लागतं.

“अग, डॉ. महात्म्यांनी अशी सहा बाळं दिली आहेत मला!”
बाहत्तरीच्या अक्का ऐंशी-नव्वदीच्या परावलंबी वृध्दांबद्दल मायेने म्हणाल्या.  त्यांच्या आणि त्यांच्या आजूबाजूच्या सोसायट्यांतल्या विकलांग वृध्दांना जाऊन बघणं, त्यांच्या घरच्यांना त्यांच्या शुश्रूषेबद्दल चार गोष्टी शिकवणं, त्या देखरेखीखाली करून घेणं, औषधं-गोळयांच्या वेळा आणि पथ्यं समजावून सांगणं आणि काहीही वावगं आढळलं तर ते तत्काळ डॉ. महात्म्यांच्या कानावर घालणं हे त्या आवडीने करत. गरज वाटली तर त्या डॉक्टरांना बोलावून घेत. पण बऱ्याचवेळा त्यांच्या प्रयत्नांमुळे डॉक्टरांची अनावश्यक खेप वाचतच असे.
“नर्सिंग हे काम नाही ग! तो छंदच आहे माझा!”
म्हणणाऱ्या अक्का एका मोठ्या सरकारी हॉस्पिटलच्या मेट्रन म्हणून निवृत्त झाल्या होत्या. मूलबाळ नसल्यामुळे त्या एरवी उतारवयात एकट्या पडल्या असत्या. पण त्यांनी आपला आयुष्यभराचा छंद पुढे चालू ठेवला. समाजात तर त्यांना मान मिळालाच पण रोजचं तेवढं चालणं, चारजणांना भेटणं यामुळे त्यांचं स्वतःचं शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यही उत्तम राहिलं.

जर्मनीतल्या मुलीकडे गेल्यावर विचारेकाकांना सांस्कृतिक विस्थापितपणा जाचला. त्यांच्यासमोर भाषेचाही मोठा प्रश्न उभा ठाकला. त्यांनी नातवाच्या मदतीने कॉम्प्यूटरचं जुजबी शिक्षण घेतलं आणि मग काय? इंग्रजी-मराठी-हिंदी बातम्या-ब्लॉग्ज-साहित्य सारं भांडार खुलं झालं त्यांच्यासाठी! शिवाय नव्यानव्या छंदांचा खजिना सापडला ते वेगळंच.

मुळात छंद नसलेच आणि आवडही भलतीच असली तरी त्या आवडीला योग्य वळण लावता येतं. “मला फक्त कुटाळक्याच करायला आवडतात हो!” जिभेच्या दांडपट्ट्याने सुनेला घायाळ करणाऱ्या कमूआज्जींनी ठणकावून सांगितलं. सूनही खमकी. तिच्या मैत्रिणींनाही तशा ‘चांभारचौकशाच करीन हो!’ म्हणणाऱ्या सासवा होत्या. सुनांनी संगनमताने सासू-संमेलनं घडवून आणली. सम-छंदी मैत्रिणींबरोबर चकाट्या पिटायची चटक लागल्यावर ‘सासू-समाज’ स्थापन व्हायला वेळ लागला नाही. सभेत अख्ख्या गावाला नावं ठेवण्यात भरपूर वेळ मजेत

जायला लागला. ‘समाजा’च्या सभा भरवणं, त्याच्यासाठी हॉल मिळवणं, सभेची आमंत्रणं करणं, खानपानादी व्यवस्था करणं, अशा अनेक लहानमोठ्या जबाबदाऱ्या पेलण्यातली गंमत सासवांच्या ध्यानात आली. सतत भांडणाऱ्या नागम्मांना सभापती बनवलं होतं. इतरांना गप्प बसवताना त्या आपलं भांडायचं कसबच विसरल्या! मग स्पर्धा, पाहुण्यांची भाषणं वगैरेत सगळयांच्याच कुटाळक्या कधी हरवल्या ते कुणाला कळलंही नाही!

एखादा छंद तारुण्यापासूनच जोपासलेला असला तर परिपक्व वयात त्याची मजा अधिक घेता येते. पण एकानेच भागत नाही. निवृत्तीनंतर किमान एक तरी नवा पूरक छंद सुरू करावा. चित्रकला, वादन यांसारख्या बैठ्या विरंगुळयांसोबत पोहणं, योगासनं हे छंद शरीर-मनाचं संतुलन साधतात.

रमाकाकूंनी शिवण शिकून झबली शिवली आणि नातवंडांवरचं प्रेम दाखवलं. सरूमावशींनी पेंटिंगचा क्लास लावून चित्रं रंगवली; आयुष्यभराच्या आठवणी आणि भावभावना व्यक्त केल्या. बहुतेक छंदांच्या निमित्ताने काहीतरी नवंच शिकायला मिळतं; हातून काहीतरी विधायक घडतं आणि भावना आणि विचार प्रकटपणे मांडले जातात. आपल्यातला कलाकार जागा होतो.

एखादा तरी छंदप्रकार असा हवा की त्यात देहभान विसरून स्वतःला झोकून देता येईल. सुमाताईंना व्हायोलिन शिकायची फार इच्छा होती. पंचावन्नीच्या शिष्येला दीक्षा द्यायला कुठलाही गुरू तयार होईना. सुमाताईंनी ते वाद्य शिकणाऱ्या एका लहान मुलीचा गंडा बांधला आणि झटून प्रॅक्टिस सुरू केली.  सुरुवातीला सारं सोपं वाटलं. पण मग एका टप्प्यावर पुढे काहीच जमेना. ताईंनी धीर सोडला नाही. तेवढ्या पुण्याईच्या जोरावर त्यांनी पुन्हा गुरू शोधला. त्यांची चिकाटी पाहून एक मातब्बर गुरू संतुष्ट झाले. शिक्षण जोमाने सुरू झालं. पण पुन्हा एकदा शिकण्याची सहजता कमी झाली; एक चढ लागला. त्या सुमाराला ताईंनी पेटून काम केलं. त्यांची बोटं सोलवटून निघाली; रक्तबंबाळ झाली. पण त्यांना फिकीर नव्हती. बोटांना घट्टे पडले आणि सूर जमले. गुरू प्रसन्न होऊन म्हणाले, ‘बरेच नवशिके त्या टप्प्याला गळतात. तुम्ही तो कठीण चढ नेटाने पार केलात. आता खरं शिक्षण होईल.’ तरीही आपण पारंगत झालो असं न मानता, वाटेतले अडथळे दूर सारून, ताईंनी आंतरिक ओढीने सराव आणि पुढचं शिक्षण चालू ठेवलं. आता अनेक गाण्यांचे सूर त्यांच्या बोटांतून सरासर उमटतात.

अशावेळी जी साफल्याची झिंग येते ती अनुभवावी. त्याचसाठी केला जावा अट्टाहास! आणि तसा अट्टाहास करायला निवृत्तीनंतरच खरा वेळ मिळतो. अशा झपाटणाऱ्या अट्टाहासाने विरंगुळा मिळत नाही; विसावा आणि उसंत नकोसे होतात. पण भरभरून आनंद मात्र मिळतो. एकटेपणा पार हरवून जातो. बुध्दी आणि मन तेजतर्रार रहातात आणि आयुष्य वाढतं तो तर बोनसच!

पन्नाशी-साठीला आयुष्यातल्या अनेक अनुभवांचा खजिना साठलेला असतो; व्यक्तिमत्त्व संपन्न, परिपक्व झालेलं असतं. अशा वेळी छंद माणसाला समाजाभिमुख करतात. त्यामुळे हातून जे विधायक कार्य घडतं तेही समाजाच्या कल्याणाचं भान राखून घडतं. अर्थात ते काम म्हणजे स्वान्तसुखाय केलेली मेहनतच असते. त्या कामामागचा मुख्य हेतू समाजसेवेचा नसतो. तरीसुध्दा त्यातून आपोआपच जगाचंही भलं होतं.

ॲना सेवेल ही इंग्लिश मुलगी अपघातामुळे बाराव्या वर्षापासून  अपंग झाली होती. मन रमवायला स्वतःसाठीच काहीबाही लिहिणं हाच तिचा छंद होता. एकोणिसाव्या शतकात तिला कायमच घोडागाडीतून प्रवास करावा लागला. त्याकाळात घोड्यांना मिळणारी निर्दय वागणूक तिला जाचत राहिली. अखेर साठीच्या आसपास, मृत्यूच्या दोनच वर्षं आधी,  तिने त्याबद्दल लिहूनच काढलं. त्या ‘ब्लॅक ब्यूटी’ नावाच्या कादंबरीने युरोपात मुक्या जनावरांना मिळणारी वागणूक बदलली.

पुलंच्या बंगाली शिकण्यातून मराठी-बंगाली मनं जोडणारी ‘वंगचित्रं’ साकारली.

ती झाली असामान्यांची गोष्ट. पण सर्वसामान्य माणसांनीही एखादा छंद असा जिवाभावाने जोपासला की सामाजिक हिताचा खारीचा वाटा नक्कीच उचलला जातो.

गजरेकाकांना किस्से, गोष्टी सांगायचा नाद होता. ते त्या गोष्टींत रंजक तपशील भरत, विनोद जोडत. सोबत उत्तम  अभिनय करून ते कथाकथन रंगवत. नव्या गोष्टी मिळवून त्यांना विनोदाचे, मौजेचे दागिने घालण्यात त्यांना अपार आनंद होई. मुलं परदेशी स्थायिक झाल्यामुळे गजरेकाका नागपुरात एकटे होते. दूर असलेल्या नातवंडांची कसूर भरून काढायला त्यांनी गल्लीतल्या सगळ्या मुलांना पंचतंत्रातल्या, इसापनीतीतल्या आणि आपल्या स्वतःच्याही गोष्टी सांगायला सुरुवात केली. अजूनही तो आनंदस्रोत चालूच आहे. त्या स्रोतात सर्वांत अधिक डुंबले ते खुद्द गजरेकाका! मुलांचा वेळही मजेत गेला. त्यांच्यावर उत्तम संस्कार झाले. आता ती गल्लीतली नातवंडं शिकूनसवरून परदेशांत पांगली आहेत आणि त्यांच्याबरोबर गजरेकाकांच्या गोष्टी जगभर पसरल्या आहेत. काका नव्या मुलांना अद्यापही गोष्टी सांगताहेत. त्यांना अजूनही कधी एकटेपणा भासलेला नाही.

त्यांना आयुष्याचा छंद सापडला आहे. त्यांचं आनंदी जीवनगाणं त्याच छंदात बांधलं आहे.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

(’लोकप्रभा’च्या सौजन्याने)